| CNR No.MHPU130004202019 | नियमीत दिवाणी दावा क्र.१११/२०१९<br>अविनाश<br>वि.<br>चंद्रभागा |
|---|---|

**निशाणी क्र. ८३ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. २ ते ५, १५, १६ व १८ यांचे विरुद्ध दि. २०.१२.२०२१ रोजी झालेला दावा फेटाळण्याचा आदेश (Dismissal) रद्द करुन त्यांना पुन्हा दाव्याचे समन्स काढण्यात यावे यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, त्यांनी सदर दावा ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील नमूद मिळकतीपैकी काही क्षेत्र वादी यांनी विविध प्रतिवादी यांना विक्री केलेले आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट केलेले होते. तथापि, सदर प्रतिवादीपैकी प्रतिवादी क्र. २ ते ५, १५, १६ व १८ यांना समन्स बजावणी झालेली नसल्यामुळे व त्याकरीता वादींनी आवश्यक स्टेप्स घेतल्या नसल्यामुळे न्यायालयाने सदर प्रतिवादींविरुद्ध दावा फेटाळल्याचा आदेश दि. २१.१२.२०२१ रोजी पारित केला आहे. तथापि, वादी यांनी जमेल तसे सर्व प्रतिवादींना सदर दाव्याची कल्पना दिलेली होती. त्यामुळेच प्रतिवादी क्र. १८ स्वतःहून सदर दाव्यात हजर झाले आहेत.

३. वास्तविक, सन २०२०-२१ या कालखंडात कोविड महामारी असल्यामुळे वादी यांना वकिलांशी संपर्क करणे व आवश्यक माहिती पुरवणे अशक्य झाले होते. त्यामुळे समन्स बजावणी न झालेल्या प्रतिवादींचे अद्यावत / दुरुस्त रहिवाशी पत्ते प्राप्त करुन घेणे व त्या अन्वये आवश्यक स्टेप्स घेणे वादी यांना शक्य झाले नाही. त्यामुळे दावा फेटाळण्याचा आदेश रद्द करणे आवश्यक झाले आहे. वादींनी जाणीपूर्वक कसूर केलेली नाही. वादी हे आवश्यक स्टेप्स घेण्यास नेहमीच तयार आहेत. असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. ६ यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून आक्षेप नोंदवला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदर अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. दि. २०.१२.२०२१ रोजीचा आदेश कोविड कालावधी संपल्यानंतर करण्यात आला आहे. अर्जास खूप विलंब

झाला आहे. अर्जास संयुक्तिक कारण नाही. अर्जात विलंबाचे कारण नमूद नाही. असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादीतर्फे युक्तीवाद नाही. प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला. निशाणी क्र. १ वरील दि. २०.१२.२०२१ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता असा आदेश करण्यात आल्याचे दिसते की, प्रतिवादी क्र. २ ते ५, १५, १६ व १८ यांच्याविरुद्ध समन्स काढण्यासाठी स्टेप्स न घेतल्यामुळे सदर प्रतिवादींविरुद्ध दि.प्र.सं. आदेश ९ नियम ५ अन्वये दावा फेटाळण्यात आलेला आहे. तसेच निशाणी क्र. १ वरील दि. ०९.११.२०२१ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता असा आदेश करण्यात आल्याचे दिसते की, वादीने प्रतिवादी क्र. २ ते ५, १५, १६ व १८ यांच्याविरुद्ध त्यांना समन्स बजावणीकामी तरतूद केली नाही. जर वादीने पुढील तारखेपर्यंत तरतूद केली नाहीतर त्यांच्याविरुद्ध योग्य ते आदेश केले जातील. या ठिकाणी दि.२४.०६.२०१९ च्या रोजनाम्याचे अवलोकन केले असता त्या तारखेला प्रतिवादी क्र. २ ते ५, १५, १६ व १८ यांच्याविरुद्ध प्रकरण स्टेप्स घेण्यासाठी लावल्याचे दिसत आहे. तसेच दि. ०९.११.२०२१ पर्यंत प्रकरण प्रतिवादी क्र. २ ते ५, १५, १६ व १८ यांच्याविरुद्ध स्टेप्स घेण्यासाठी लावलेले होते असे दिसते. दि.प्र.सं.चे आदेश ९ नियम ५ मधील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे नियम ५ मधील तरतुदीनुसार वादीने दोन महिन्याच्या आत पुन्हा सदर प्रतिवादींना नव्याने समन्स काढण्याची आवश्यकता होती. तथापि, वादीने सदर प्रतिवादींच्याविरुद्ध दोन महिन्यात समन्स काढण्याचा अर्ज केल्याचे दिसून येत नाही. वादीने सदर निशाणी क्र. ८३ वरील अर्ज दि. १४.११.२०२४ रोजी म्हणजेच दोन महिने उलटून गेल्यानंतर केलेला दिसून येत आहे. जो की, मा. उच्च न्यायालयाचे दि.प्र.सं.चे आदेश ९ नियम ५ मधील दोन महिन्याच्या तरतूदीपेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यानंतर केला गेला आहे. त्यामुळे सदर अर्ज कायद्याने चालू शकत नाही. तसेच मी या ठिकाणी हे देखील नमूद करतो की, दि.प्र.सं.चे आदेश ९ नियम ५ नुसार जर दावा फेटाळला गेला असल्यास सदर नियमातील उपनियम २ नुसार वादीला मुदत कायद्याच्या अधिनतेने नवीन दावा आणता येईल. मी या ठिकाणी हे नमूद करतो की, दि.प्र.सं.चे आदेश ९ नियम ५ अन्वये केलेल्या दाव्या फेटाळण्याच्या आदेशाविरुद्ध परत सदर

आदेश रद्द करुन मागण्यासाठी ज्या कोर्टाने आदेश केला आहे त्याच कोर्टाकडे परत आदेश रद्द करण्याचा अर्ज करण्याची तरतूद नाही. म्हणजेच याच न्यायालयासमोर सदर अर्ज चालू शकत नाही. वरील कारणांचा विचार करता अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन खालील आदेश पारीत करत आहेः–

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

RAVINDRA ANANDRAO SAWANT Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT Date: 2026.07.23 17:14:25 +0530

दिनांकः २३.०७.२०२६ **( रविंद्र आ. सावंत )**

सासवड. २ रे सह दि.न्या.क. स्तर, सासवड.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 23/07/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 23/07/2026 |
| Order Uploaded on | : | 23/07/2026 |